| MHST150007642021 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १६.०८.२०२१ |
| | नोंदणी दिनांक | : | १६.०८.२०२१ |
| | निकाल दिनांक | : | २३.०६.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०४ १० ०७ |

**वडूज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**
**तालुका खटाव, जिल्हा सातारा यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : एम.आय.एस. दर्यावर्दी)**
(न्यायनिर्णय : दिनांक २३.०६.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २०९/२०२१ निशाणी क्र.४९**

**प्रथम खबरी अहवाल/गुन्हयाचा तपशील –**
गुन्हा नोंद क्र. : १२/२०२१
पोलीस ठाणे : वडूज पोलीस ठाणे

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत प्रभारी अधिकारी वडूज पोलीस ठाणे<br>तालुका खटाव, जिल्हा सातारा. |
| **सरकारी अभियोक्ता** | श्री. पी. व्ही. जोशी. |
| **आरोपी** | १. **किरण ज्ञानदेव तुपे**<br>वय : २१ वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>रा– डांबेवाडी, तालुका खटाव, जिल्हा सातारा.<br>२. **संजय मोतीराम मदने**<br>वय : ४० वर्षे, व्यवसायः शेती,<br>३. **अविनाश बाळु जाधव**<br>वय : २६ वर्षे, व्यवसायः शेती,<br>अ.नं.२ व ३ रा– हिरवरवाडी, तालुका खटाव, जिल्हा |

| | |
|---|---|
| | सातारा |
| **आरोपींतर्फे वकील** | श्री. पी. डी.सावंत |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ११.०१.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दाखल झाल्याचा दिनांक | ११.०१.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १६.०८.२०२१ |
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविलेचा दिनांक | ०७.०७.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२.०४.२०२४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णय दिनांक | २३.०६.२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा दिनांक, असल्यास | –– |

**<u>आरोपींचा तपशील</u>**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ नुसार संपरिक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | किरण ज्ञानदेव तुपे | ११.०१.२०२१ | १५.०१.२०२१ | म. दा. का कलम ६५ ई अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| २ | संजय मोतीराम मदने | ११.०१.२०२१ | १५.०१.२०२१ | म. दा. का कलम ६५ ई अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ३ | अविनाश बाळू जाधव | ११.०१.२०२१ | १५.०१.२०२१ | म. दा. का कलम ६५ ई अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

**<u>अभियोगपक्ष, बचावपक्ष, न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**अ. <u>अभियोगपक्षाचे साक्षीदार</u>**

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | प्रशांत सुरेश कोळी | पंच |

| | | |
|---|---|---|
| २ | नवनाथ हरिबा शिरकुळे | फिर्यादी |
| ३ | सागर दिगंबर बदडे | साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यास–**

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास**

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचावपक्ष, न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. अभियोगपक्ष–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | ३६ | पंचनामा |
| २ | ४३ | फिर्याद |

**ब. बचावपक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | एमआर नंबर ९/२०२१ | १. मॅगडॉल नं.१ व्हीस्की असे लेबल असलेल्या १८० |

| | | |
|---|---|---|
| | | मिलीच्या ७६ सीलबंद बाटल्या<br>२. विदेशी दारु इंम्पीरिअल ब्लयू १८० मिलीच्या ४४ सीलबंद बाटल्या<br>३. विदेशी दारु रॉयल स्टॅग १८० मिलीच्या १७ सीलबंद बाटल्या<br>४. टुबर्ग बिअरच्या ६५० मिलीच्या ६० सीलबंद बाटल्या<br>५. विदेशी दारु व्हाईट मिसचिप असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या ३ सीलबंद बाटल्या<br>६. विदेशी दारु रोमनो असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या ४ सीलबंद बाटल्या<br>७. देशी दारु टॅगो पंच असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या ३८४ सीलबंद बाटल्या<br>८. देशी दारु टँगो पंच असे लेबल असलेल्या ९० मिलीच्या ७०० सीलबंद बाटल्या<br>९. पांढरे रंगाची स्कारपिओ क्र. एम.एच.११ ए. एम. ४७४७ |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक २३.०६.२०२६)

आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५– ई अन्वये सदरचा गुन्हा दाखल केला आहे.

**<u>अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u>:–**

**०२.** फिर्यादी नवनाथ हरिबा शिरकुळे यांनी फिर्याद दिली की, दि.१०.०१.२०२१ रोजी सायंकाळी १८.०० वाजणेचे सुमारास ते वडूज पोलिस ठोणेत हजर असताना उपविभागीय अधिकारी दहिवडी भाग कॅम्प वडूज यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पाचवड ते एनकुळ रस्त्यावर अविनाश बाळू जाधव रा.हिवरवाडी हा त्यांचे ताब्यातील स्कारपिओ गाडी क्र. एम.एच.११ ए. एम.

४७४७ मधून देशी व विदेशी दारुची वाहतुक करीत आहे. त्यांनी दोन पंचाना बोलावून आणले. त्यानंतर पोलिस व पंचाना बातमीचा आशय समजावून सांगितला. त्यानंतर ते तसेच मा.उप विभागीय पोलिस अधिकारी देशमुख, पोलिस नाईक खाडे, पोलिस कॉन्स्टेबल बदडे, माने व दोन पंच असे सरकारी व खाजगी वाहनाने कातरखटाव मार्गे रवाना झाले. त्यानंतर मौजे हिरवरवाडी गावी पोहचले असता मिळालेल्या बातमीच्या अलिकडे गाडी उभी करुन रस्त्याचे कडेला उभे राहिले. त्यानंतर रात्री ०९.०० वाजणेचे सुमारास त्यांना एक पाचवड बाजूकडून गाडी येत असलेली दिसली. त्यांनी सदरची गाडी थांबवून गाडीची पाहणी केली असता गाडीचा क्रमांक एम.एच. ११ ए. एम. ४७४७ असून सदर गाडीचे डिकी व मधले बाजूचे सीट व गाडीची पाहणी केली असता गाडीमध्ये विदेशी, देशी, तसेच बिअरचे बॉक्स मिळून आले. त्यावेळी गाडीतील चालक किरण ज्ञानदेव तुपे व त्याचे सोबत असलेला संजय मोतीराम मदने, अविनाश बाळू जाधव होते. त्यांना देशी व विदेशी दारु वाहतुकीचा परवाना आहे का असे विचारले असता त्यांचेकडे तो मिळून आला नाही. सदर मुद्देमालाचा एस. एच. खाडे पोलिस नाईक यांनी दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा केला.

**०३.** आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी प्रतिबंधक कायदा चे कलम ६५–ई अन्वये गुन्हा क्र. १२/२०२१ नोंदवुन पुढील तपास बी. एस. खांडेकर पोलिस नाईक यांचेकडे देण्यात आला. तपासादरम्यान जप्ती पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, आरोपींना अटक केली व आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या खटल्याममध्ये आरोपी हजर झालेवर निशाणी ३२ वर महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५–ई अन्वये आरोपीचे निवेदन नोंदवण्यात आले. आरोपीने आरोप नाकारुन संपरिक्षेला सामोर जाण्याची पसंती दर्शविली.

**०५.** प्रस्तुत प्रकरणात आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी ४५ ते ४७ वर नोंदवले असता आरोपींनी त्यांचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला.

**०६.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपी यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुरावा व आरोपीचा बचाव पाहता माझे विचाराधीन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, दिनांक १०.०१.२०२१ रोजी रात्री ०९.०० वाजण्याच्या सुमारास माजे हिवरवाडी, तालुका खटाव, जिल्हा सातारा गावचे हद्दीत पाचवड ते एनकुळ जाणारे रोडवर आरोपींनी बेकायदेशीररित्या देशी, विदेशी दारुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगुन मिळुन आले ? | नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

–:– **<u>का र ण मि मां सा</u>** –:–

**०८.** प्रस्तुत खटल्यात आरोपी हे विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी विदेशी दारु चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगुन होते. त्यामुळे गु. र. क्र.

१२/२०२१ नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे निश्चीत केलेले दोषारोप शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे प्रकरणात तीन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>:–**

**०९.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला सा. क्र. १ प्रशांत सुरेश कोळी यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक १०.०१.२०२१ रोजी त्यांना पोलिस शिरकोळे यांचा फोन आला होता. त्यानंतर ते वडूज पोलिस स्टेशनला गेले. तेथे त्यांना सांगिते की, दारुची अवैधरित्या वाहतुक होणार आहे, त्या ठिकाणी जायचे आहे. त्यानंतर पोलिस तसेच ते कातरखटाव मार्गे हिवरवाडीच्या दिशेने गेले. ते हिवरवाडी रोडला ०८.३० वाजता थांबले असता पाचवडकडून एक स्कॉर्पिओ गाडी एनकुळ गावाकडे आली. ती गाडी पोलिसांनी थांबवली असता गाडीच्या डिक्कीमध्ये बॉक्स होते व गाडीमध्ये चालक किरण तुपे, मदने व अविनाश जाधव होते. सदरील बॉक्स दारुचे होते. पेोलिसांनी ते बॉक्स ताब्यात घेवून त्यामध्ये पाहिले असता त्यामध्ये देशी, विदेशी दारु होती. सदरील मुद्देमाल साधारणतः र.रु.६९,०००/– रुपयांचा होता. पोलिसांनी तो मुद्देमाल ताब्यात घेवून पंचनामा निशाणी ३६ तयार केला.

**१०.** आरोपीतर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सा. क्र. १ यांनी मान्य केले की, ते पोलिस पाटील असल्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये पंच म्हणून काम केले आहे, मायणी ते वडूज २२ ते २३ किमी अंतर असून पाचवड ते एनकुळ अंतर ५ ते ७ किमी अंतर आहे. प्रत्यक्ष गाडी ज्या ठिकाणी थांबवली होती त्या ठिकाणाच्या चतुःसीमा त्यांना सांगता येणार नसल्याचे मान्य केले. त्यांनी ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष दिली आहे. पंचनाम्यातील मुद्देमालाबाबत ते स्पष्टपणे सांगू

शकत नाही. त्यांनी पोलिसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली आहे.

**११.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला फिर्यादी सा. क्र. २ नवनाथ हरिबा शिरकुळे यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक १०.०१.२०२१ रोजी ते वडूज पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख साहेब यांनी त्यांना, खाडे, माने, बदडे यांना बोलावून सांगितले की, पाचवड ते एनकुळ जाणाऱ्या रोडवर अविनाश बाळू जाधव हा दारूची चोरटी वाहतुक करीत आहे. त्यांनी दोन पंचांना बोलावून घेतले. त्यानंतर ते सर्वजण एका सरकारी व खाजगी वाहनाने हिवरवाडी येथे गेले. रात्री ०९.०० वा. चे दरम्यान पाचवड ते एनकुळ मार्गे येणारी स्कॉर्पिओ गाडी आली. सदर गाडी थांबवून त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव किरण तुपे असे सांगितले. गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी, विदेशी दारू होती. चालकासोबत अविनाश जाधव व संजय मोतीराम मदने होते. सदर इसमांकडे परवाना नव्हता. गाडीमध्ये मॅकडॉनल्डचे २ बॉक्स, इम्पीरिअल ब्ल्यू चे १ बॉक्स, देशी दारूचे ८ बॉक्स, टुबर्ग बिअरचे ५ बॉक्स, देशी दारू टँगो पंचचे १८० मिलीचे ८ बॉक्स होते. सदरील त्यांनी मुद्देमाल जप्त केला. त्यापैकी प्रत्येकी एक सि.ए करीता बाटली राखुन ठेवली व सदर मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा खाडे यांनी तयार केला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरूध्द मी फिर्याद निशाणी ४३ दिली. टायपिंग चुकीमुळे खबरी जबाबात १०.०१.२०२१ ऐवजी १०.०१.२०२० अशी तारीख नमूद झाली असल्याचे सांगितले. न्यायालयात त्यांनी आरोपींना ओळखले.

**१२.** आरोपीतर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सा. क्र. २ फिर्यादी यांनी मान्य केले की, दि. १०.०१.२०२० रोजीच्या घटनेबाबत मी तक्रार दिली नव्हती. ज्या सरकारी वाहनाने ते छापा टाकण्याकरीता गेले होते त्याबाबत

स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. त्यांनी ज्या पंचांना बोलावून घेतले होते त्यांची नावे त्यांना आठवत नाहीत. खबरी जबाब टायपिंग करताना दि. १०.०१.२०२१ तयार केला होता. परंतु, उशीर झाल्यामुळे ते पेनाने १० तारखेला ११ तारीख करण्यात आली होती. तारखेत पेनने बदल केल्यानंतर त्यांनी त्यांची काऊंटर सिग्नेचर केली नाही.

**१३.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला सा. क्र. ३ सागर दिगंबर बदडे यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक १०.०१.२०२१ रोजी ते वडूज पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख साहेब यांनी त्यांना, खाडे, माने, शिरकुळे यांना बोलावून सांगितले की, पाचवड ते एनकुळ जाणाऱ्या रोडवर अविनाश बाळू जाधव हा दारूची चोरटी वाहतुक करीत आहे. शिरकुळे यांनी दोन पंचांना बोलावून घेतले. त्यानंतर ते एका सरकारी व खाजगी वाहनाने हिवरवाडी येथे गेले. रात्री ०९.०० वा. चे दरम्यान पाचवड ते एनकुळ मार्गे येणारी स्कॉर्पिओ गाडी क्र. एम एच ११ ए एल ४७४७ आली. सदर गाडी थांबवून त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव किरण तुपे असे सांगितले. गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी, विदेशी दारू होती. चालकासोबत अविनाश जाधव व संजय मोतीराम मदने होते व त्यांच्याकडे परवाना नव्हता. गाडीमध्ये देशी व विदेशी दारूचे बॉक्स एकूण रक्कम रू. ४,६९,९९८/- होते. सदरील मुद्देमाल जप्त केला. त्यापैकी प्रत्येकी एक सि.ए करीता बाटली राखुन ठेवली व सदर मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा खाडे यांनी तयार केला व आरोपीविरूध्द फिर्याद शिरकुळे यांनी दिली.

**१४.** आरोपीतर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सा. क्र. ३ यांनी मान्य केले की, दि. १०.०१.२०२० रोजी आम्ही घटनास्थळी गेले नव्हते. जप्त केलेला मुद्देमाल हा कोणत्या कंपनीचा, किती एमएलच्या किती बाटल्या होत्या

हे त्यांना सांगता येणार नाही.

**१५.** अभियोगपक्षाचा पुरावा पाहता अभियोगपक्षाने फिर्यादी, जप्ती पंच व साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर नोंदवलेली आहे. साक्षीदार क्र.१ जप्ती पंच हे पोलिस पाटील असल्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये पंच म्हणून काम केले आहे. प्रत्यक्ष गाडी ज्या ठिकाणी थांबवली होती त्या ठिकाणाच्या चतुःसीमा त्यांना सांगता आल्या नाहीत. त्यांनी ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष दिली आहे. पंचनाम्यातील मुद्देमालाबाबत ते स्पष्टपणे सांगू शकले नाहीत. त्यांनी पोलिसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली आहे. त्यामुळे जप्ती पंचनामा संशयापलीकडे शाबित झाला नाही. साक्षीदार क्र.२ फिर्यादी असून, ज्या सरकारी वाहनाने ते छापा टाकण्याकरीता गेले होते त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. त्यांनी ज्या पंचांना बोलावून घेतले होते त्यांची नावे त्यांना सांगता आली नाहीत. साक्षीदार क्र.३ यांनी त्यांच्या उलटतपासा दरम्यान मान्य केले की, जप्त केलेला मुद्देमाल हा कोणत्या कंपनीचा, किती एमएलच्या किती बाटल्या होत्या हे त्यांना सांगता आले नाही.

**१६.** सदर कामी तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाच्या आजुबाजूच्या साक्षीदाराचे जबाब नोंदवले नाहीत. तसेच अभियोगपक्षाने इतर स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. पुरेशी संधी असून सुध्दा अभियोगपक्षाने इतर साक्षीदार व तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदवलेली नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होत आहे.

**१७.** प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने जप्त मुद्देमाल रासायनिक परीक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदरच्या अहवालाचे अवलोकन केले असता जप्त नमुना मध्ये सॅम्पल क्र.१ ते ३ व ५ ते ८ यामध्ये ४२ टक्के इथील

अल्काहोल मिळुन आले. तसेच सॅम्पल क्र.४ मध्ये ४ टक्के इथील अल्काहोल मिळुन आले. परंतु सॅम्पल पुणे येथे घेऊन जाणारा पोलिस साक्षीदार अभियोगपक्षाने तपासला नाही. त्यामुळे जप्त गुन्हयातील नमुना तपासणीकरीता पाठवला होता ही बाब निर्वीवादपणे शाबित होत नाही. त्यामुळे आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारु बंदी कायदयाप्रमाणे मादक द्रव्य असुन आरोपी सदर मादक द्रव्य बाळगलेल्या स्थितीत मिळुन आली व तो मादक द्रव्याची विक्री करीत होती असे गृहीत धरणे उचीत होणार नाही. अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन आरोपीविरुध्द केलेले आरोप संशयापलीकडे शाबित होत नाहीत. अशा परिस्थितीत आरोपीस दोषमुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे दोषारोप संशयापलीकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. वरील सर्व पुराव्यावरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा शाबीत होत नसल्यामुळे मी मुद्दा क. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र. २ करीता</u>:–

१८. अभियोगपक्षाने मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षावरुन आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल देशी व विदेशी दारु अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांना कायद्याप्रमाणे विल्हेवाट करणेबाबत आदेशीत करणे योग्य होईल. तसेच जप्त मुद्देमाल एक पांढरे रंगाची स्कार्पिओ गाडी क्र. एम.एच. ११ ए. एम. ४७४७ ही मुळ मालकाचे ताब्यात दिल्याचे दिसत आहे. सबब अपील कालावधी नंतर मुळ मालकाचा ताबा कायम करणेत यावा. सबब, मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## –: **आ दे श :–**

०१. आरोपी क्र.१ किरण ज्ञानदेव तुपे, आरोपी क्र.२ संजय मोतीराम मदने, आरोपी क्र.३ अविनाश बाळू जाधव यांची महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५–ई मधुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

०२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

०३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल १. दोन खाकी रंगाचे बॉक्समधील विदेशी दारु मॅगडॉल नं.१ व्हीस्कीच्या १८० मिलीच्या ७६ सीलबंद बाटल्या, २. एका खाकी रंगाच्या बॉक्समधील विदेशी दारु इम्पीरिअल ब्लयूच्या १८० मिलीच्या ४४ सीलबंद बाटल्या, ३. एका खाकी रंगाच्या बॉक्समधील विदेशी दारु रॉयल स्टॅगच्या १८० मिलीच्या १७ सीलबंद बाटल्या, ४. पाच खाकी रंगाच्या बॉक्समधील बिअरचे टुबर्ग बिअरच्या ६५० मिलीच्या ६० सीलबंद बाटल्या, ५. एका खाकी रंगाच्या बॉक्समधील विदेशी दारु व्हाईट मिसचीप १८० मिलीच्या ३ सीलबंद बाटल्या, ६. एका खाकी रंगाच्या बॉक्समधील विदेशी दारु रोमनो १८० मिलीच्या ४ सीलबंद बाटल्या, ७. आठ खाकी रंगाचे बॉक्समधील देशी दारु टॅगो पंच १८०मिलीच्या ३८४ सीलबंद बाटल्या, ८. सात खाकी रंगाचे बॉक्समधील देशी दारु टॅगो पंच ९० मिलीच्या ७०० सीलबंद बाटल्या या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, सातारा यांना कायद्याप्रमाणे विल्हेवाट करणेबाबत पाठविण्यात याव्यात.

०४. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक पांढरे रंगाची स्कार्पिओ गाडी क्र. एम.एच. ११ ए. एम. ४७४७ ही अपील कालावधी नंतर मुळ मालकाने त्याचा ताबा कायम करावा.

०५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/– चे प्रत्येकी वैयक्तीक जात मुचलका व त्याच रकमेचा एक जामीनदार सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Digitally signed by MOHAMMED IMRAN DARYAWARDI Date: 2026.06.23 16:42:25 +0530

ठिकाण : वडूज.
दिनांक : २३.०६.२०२६

(एम.आय.एस.दर्यावर्दी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
वडूज, जिल्हा सातारा.